# प्रेस नोट

दिनांक ०८/१०/२०२१

## एक नाईझेरियन नागरिकांस कोकेन हा अंमलीपदार्थ विक्रीकरता बाळगल्याप्रकरणी मालवणी पोलीस ठाणे ए.टी.सी.पथका कडून अटक

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी मुंबई शहरामध्ये अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द धडक मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यास अनुसरून मा. सह. पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग श्री. प्रविण पडवळ यांनी प्रत्येक पोलीस ठाणेस अंमली पदार्थ विक्रीचे अड्डे व इसम शोधून कारवाई करण्याबाबत योग्य ते मार्गदर्शन केले होते. त्यानुसार परिमंडळ–११ चे मा.पोलीस उप आयुक्त श्री. विशाल ठाकुर यांनी परिमंडळ–११ मधील सर्व पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व विशेष अधिकाऱ्यांची बैठक घेवून त्यांना सदर प्रकरणी योजनाबध्द कारवाई करण्याचे मार्गदर्शन केले होते.

मालवणी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शेखर भालेराव यांनी मा. वरिष्ठांच्या वरिल मार्गदर्शनास अनुसरून मालवणी पोलीस ठाणे परिसरात अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या इसमांचा शोध घेवून त्यांचेवर कारवाई करण्याकरीता पोलीस ठाणेतील सर्व पोलीस अधिकारी यांना आदेशीत केले होते. दिनांक ०८/१०/२०२१ रोजी ए.टी.सी पथकाचे अधिकारी पो.उ.नि.चारुदत्त खोंडे यांना त्यांचे खास बातमीदाराकडून मालवणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक नायजेरियन इसम त्याचेकडील "कोकेन" (Cocaine) या अंमली पदार्थाची त्याच्या ग्राहकांना विक्री करण्याकरीता येणार असल्याची खबर मिळाली होती.

नमूद मिळालेल्या खबरीनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शेखर भालेराव यांचे मार्गदर्शनाखाली तात्काळ पोलीस निरीक्षक विठ्ठल बैनवाड,ए.टी.सी.पथकाचे पो.उ.नि.चारुदत्त खोंडे, पो.ना.क्र.९७०४५५/ सचिन पवार, पो.शि.क्र.०६१५९९/निलेश कुरखुडे, पो.शि.क्र.०९१५९१/निखील जाधव यांनी त्यांच्या पथकासह **वेलंकनी देवी मंदिराच्या समोरील रोडवर, श्रीराम मंदिर रोड, मालवणी गाव, मार्वे रोड, मालाड (प.), मुंबई** या परिसरात सापळा रचला असता तेथे अंमली पदार्थ विक्री करण्याकरीता आलेला नायजेरियन इसम नामे गॉडविन अजाह चुक्वु, **(GODWIN AJAH CHUKWU,Age 28 Yrs.)** धंदा–अंमली पदार्थ विक्री, रा.ठी.–प्लॅट नं–बी/०१,तळमजला, श्रीराम मंदिर गल्ली, मातृछाया कॉटेज वेल्फर सोसायटी जवळ, मालवणी गाव, मालाड (प.), मुंबई. यास त्याच्या संशयीत हालचालींवरून ताब्यात घेवून त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एकूण रूपये १५,१५,०००/–किमतीचे १५१.५ ग्रॅम "कोकेन" (Cocaine) हा अंमली पदार्थ मिळून आला. त्यामुळे रितसर त्यास ताब्यात घेवून गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक विठ्ठल बैनवाड करीत आहेत.

अशा प्रकारे सदरच्या उल्लेखनिय कामगिरीत मा.सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती अस्मिता भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शेखर भालेराव यांच्या देखरेखीखाली मालवणी पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक विठ्ठल बैनवाड, ए.टी.सी.पथकाचे पोलीस उप–निरीक्षक चारुदत्त खोंडे, पो.ना.क्र. ९७०४५५/ सचिन पवार, पो.शि.क्र.०६१५९९/निलेश कुरखुडे, पो.शि.क्र.०९१५९१/निखील जाधव यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला होता.

Scanned with CamScanner